# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रा निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र.२५६५१४३ E-mail:dternag_nag@sancharnet.in फॅक्स क्रं. ०७१२–२५६१६६३


क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि—३/गु.यादी/२०१३/3883

दि. 16 NOV 2013

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :— शैक्षणिक वर्ष २०१३—१४ मधील गुणवत्ता याद्या पडताळणीबाबत.

संदर्भ :— १) या कार्यालयाचे पत्र क्र तंशिसं/प्राकाना/शैवि—३/गु.यादी/२०१३/३४१९, दि. ०३.१०.२०१३
२) या कार्यालयाचे पत्र क्र तंशिसं/प्राकाना/शैवि—१/२०१३/३६४८, दि. २२.१०.२०१३

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१३—१४ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी, एमबीए, एमसीए, एम.फार्म., एम.ई. पदव्युत्तर पदवी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करावयाची प्रक्रिया दि. ०७ ऑक्टोबर २०१३ पासून सुरूवात झालेली आहे. परंतू असे निदर्शनास आले आहे की, ब—याच संस्थेच्या पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१३—१४ मधील गुणवत्ता याद्यांची पडताळणी झालेली नाही याबाबत या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २ चे पत्रान्वये आपणांस कळविण्यांत आलेले होते. तरी संस्थांनी वेळापत्रकातील दिलेल्या दिनांकाची वाट न पाहता वेळापत्रकाच्या आधी सुध्दा या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून वेळेच्या आंत गुणवत्ता याद्या तपासून घेणे गरजेचे आहे.

तरी आपणांस कळविण्यांत येते की, आपले संस्थेतील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयाकडून **दिनांक २२.११.२०१३** पर्यंत पडताळणी करून घ्याव्यात. दिलेल्या दिनांकानंतर आलेल्या संस्थांची गुणवत्ता याद्यांची तपासणी करण्यांत येणार नाही याची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी. तसेच ज्या संस्थांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यांत आलेल्या आहेत व ज्यांच्या त्रुटया शिल्लक राहीलेल्या आहेत अशा संस्थांनी शिल्लक राहीलेल्या त्रुटया त्वरीत पूर्ण करून गुणत्ता याद्यांच्या फाईस या कार्यालयात त्वरीत जमा करण्यांत याव्यात.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

my computer/local diskD:/backup C drive/my document/OfficeOrder (E)